जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५७ दिनांक - ३१/१०/२०२४**

युनिट ६ गुन्हे शाखा, पुणे शहर

## सराईत घरफोडी करणारा व एकुण १२ गुन्हयात पाहिजे असलेल्या आरोपीस केले जेरबंद

दि.३०/१०/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ हद्दीमध्ये आगामी विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुशंगाने मा.वरिष्ठांचे आदेशाने पाहिजे आरोपी यांचा शोध घेणेकामी युनिट ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस अंमलदार बाळासाहेब सकटे, नितीन मुंढे सुहास तांबेकर, असे पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार नितीन मुंढे यांना बातमी मिळाली की, रेकॉर्ड वरील पाहिजे आरोपी पापासिंग दयालसिंग दुधानी हा बीटी कवडे रोड, वानवडी, पुणे येथे थांबलेला आहे अशी खात्रिशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणावरून नमुद आरोपी नामे **पापासिंग दयालसिंग दुधानी, वय ५० वर्षे, रा.पेरणे, बिराजदार नगर, गल्ली नं.५, हडपसर, पुणे** यास ताब्यात घेतले व त्याचेकडे चौकशी करून **हडपसर पो.स्टे. १) गु.र.नं. ६४०/२०२१, भा.द.वि.क. ४५४, ३८० व २) गु.र.नं. ७४६/२०२१, भा.द.वि.क. ३७९** या गुन्हयांतील सहभाग निश्चित झाल्याने त्यास पुढील तपासकामी हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे ताब्यात दिले आहे.

आरोपीकडे केलेली चौकशी तसेच त्याचे पुर्व रेकॉर्ड तपासता नमुद आरोपीवर घरफोडी व इतर गुन्हे दाखल आहेत. सदरचा आरोपी हा पुणे शहर, पिंपरी चिंचवड, सागली येथील गुन्हयांमध्ये पाहिजे आरोपी आहे. तसेच सदर आरोपीवर यापुर्वी मोका कायदयान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),पुणे शहर श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),पुणे शहर श्री. निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ पुणे श्री. राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ६ पुणे शहर चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस उप-निरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार रमेश मेमाणे, बाळासाहेब सकटे, सुहास तांबेकर, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, ऋषीकेश ताकवणे ,सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, समीर पिलाने, गणेश डोंगरे, शेखर काटे, नितीन धाडगे, बाळासाहेब तनपुरे, प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे यांनी केली आहे.